CMYK

ई-गव्हर्नन्समुळे 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेची रक्कम कमी वेळेत थेट खात्यात जमा होणे शक्य - मुख्यमंत्री >> पान 2

१४४ वर्ष जुन्या ऐतिहासिक 'मारबत' उत्सवाला सुरुवात >> पान 4

**सुविचार**

तुम्ही प्रत्येक वेळेस नवीन चूक करत असाल तर नक्कीच समजा तुमची प्रगती होत आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 28 ■ बुधवार, दि. 04 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


मशिदीत घुसण्याची भाषा करणाऱ्या नितेश राणेंना खासदार संजय राऊत यांचं सणसणीत प्रत्युत्तर

आतील पान



# राज्यभरातील एसटी कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपाची हाक

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बुलडाणा** : विविध प्रलंबित मागण्यांसाठी राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांनी पुन्हा एकदा संपाचं हत्यार उपसलं आहे. आज मंगळवारपासून राज्यभरातील एसटी कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपाची हाक दिली आहे. यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव जळगाव जामोद संग्रामपूर या भागामध्ये पहाटेपासूनच या संपाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. जिल्ह्यातून धावणाऱ्या एसटी बसेस या डेपोमध्ये उभ्या आहेत. त्यामुळे प्रवाशांचा खोळंबा झाला असून स्थानकावर गर्दी दिसून येत आहे.

संत नगरी शेगाव येथील बसस्थानकावर आज मंगळवारी सकाळी ६ वाजेपासूनच एसटी कर्मचाऱ्यांनी संप पुकारला आहे. त्यामुळे एसटी बसेस या डेपोमध्येच उभ्या आहेत. त्यामुळे शेगाव येथून राज्यातील कानाकोपऱ्यामध्ये जाणाऱ्या एसटी बसेस खोळंबल्या आहेत. एसटी कर्मचाऱ्यांनी डेपोबाहेरच आंदोलन सुरू केलंय. आपल्या मागण्यासाठी जोरदार घोषणा एसटी कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे. या बंदमुळे प्रवाशांचे मोठे हाल होताना दिसून येत आहे. एसटी बसस्थानकात प्रवाशांची मोठी गर्दी निर्माण झाली असून सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात येत आहे.

## अकोल्यात देखील एसटी कर्मचाऱ्यांनी धरणे आंदोलना सोबतच पुकारला संप

दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी** :एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे करावे यासह विविध मागण्यांसाठी आज एसटी कर्मचाऱ्यांच्या कृती समितीने राज्यव्यापी आंदोलन पुकारले आहे. अकोल्यात देखील एसटी कामगारांनी धरणे आंदोलनासोबतच संप पुकारला आहे. अकोला आगारातून एसटी सेवा ठप्प झाली आहे. राज्य परिवहन कामगारांच्या विविध महत्वाच्या प्रश्र्नांची सोडवणूक होत नसल्याने कामगारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. त्यामुळे



एसटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन सुरू आहे. आज सकाळी ६ वाजल्यापासून हा बंद पुकारण्यात आला आहे. पहाटेपासून अकोला आगारामधून एकही बस निघाली नाही आहे. अकोला मध्यवर्ती बस स्थानकावर सकाळच्या सहा वाजता पासूनच इथल्या एसटी कर्मचाऱ्यांनी हा संप पुकारला आहे.

## बुलढाण्यात एसटी कर्मचाऱ्यांनी लालपरीची चाके थांबवली



**बुलडाणा/प्रतिनिधी** : राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन द्यावे ,नवीन बस देण्यात यावी, बस सेवा नियमित वेळेत सुरू ठेवण्यात यावी यासह विविध प्रलंबित मागण्यांसाठी एसटी कर्मचाऱ्यांनी पुन्हा एकदा संपाचं हत्यार उपसलं आहे. बुलढाण्यातील एसटी आगारात एसटी कर्मचाऱ्यांनी धरणे आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनामुळे प्रवाशांचे मोठे हाल होताना दिसून येत आहे. एसटी बसस्थानकात प्रवाशांची मोठी गर्दी निर्माण झाली असून कर्मचाऱ्यांकडून जोरदार घोषणाबाजी करण्यात येत आहे.

## महाराष्ट्रात लाल परीची चाके थांबली,एसटी कर्मचारी संपावर गेल्याने वाहतूक व्यवस्था विस्कळीत





दैनिक आपला विदर्भ

**बारामती/प्रतिनिधी** : गणेश उत्सव तोंडावर आलेला असताना महाराष्ट्रात एसटी सेवा विस्कळीत झाली आहे. एसटी कामगार संयुक्त कृती समितीच्या वतीने प्रलंबित मागण्या मान्य न झाल्यास आजपासून एसटी कर्मचाऱ्यांच्या वतीने बेमुदत करणे आंदोलन सुरू,बारामतीत देखील बस आगारामध्ये कर्मचाऱ्यांच्या वताने काम बंद आंदोलन पुकारण्यात आले आहे. राज्य सरकारने आम्हाला शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन न दिल्यास दोन दिवसांत आंदोलन तीव्र स्वरूपात छेडले जाईल, असा ईशारा एसटी कर्मचाऱ्यांच्या वतीने राज्य सरकारला देण्यात आला आहे.

## एसटी कर्मचाऱ्यांचा विविध मागण्यांसाठी आज राज्यभर संप, प्रवाशांची गैरसोय



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी** : एसटी कर्मचारी विविध मागण्यांसाठी आज राज्यभर संपावर उतरले आहेत. त्यामुळे बसेस बंद असल्याने शालेय विद्यार्थी व प्रवाशांचे गैरसोय होताना दिसत आहे. नेहमी बस स्थानकावर बसेसची ये जा सुरू असते, परंतु आज संप असल्याने बस स्थानकावर बसेसची ये जा कुठेतरी कमी दिसत आहे. चोपडा बस स्थानकातील काही कर्मचारी संपात सहभाग झाले आहेत तर काही कर्मचारी कामावर हजर आहे त्यामुळे चोपडा बस स्थानकात काही फेऱ्यात जरी सुरू असल्या तरी त्या वेळेवर नसल्याने प्रवाशांना बऱ्याच वेळ वाट पाहून शेवटी खाजगी वाहनाने पुढच्या प्रवास करावा लागत आहे. या एसटी कामगारांच्या संपाचा फटका शालेय विद्यार्थ्यांसह प्रवाशांना होताना दिसत आहे.

## एसटी कर्मचाऱ्यांनी संप करू नये!

### सकारात्मक चर्चेतून मार्ग काढू; मुख्यमंत्री शिंदेंचं आवाहन

दैनिक आपला विदर्भ





**मुंबई/प्रतिनिधी** : एसटी कर्मचाऱ्यांनी संप करू नये. सकारात्मक चर्चेतून मार्ग काढू, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी एसटी कर्मचाऱ्यांना केले आहे. मंगळवारी सकाळपासूनच एसटी कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी संप पुकारला असून राज्यभरातील प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहे.

याबद्दल बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, राज्य सरकारने यासंबंधी बुधवारी बैठक बोलवली असून यात सकारात्मक चर्चा होणार आहे. राष्ट्रपती महाराष्ट्रात आहेत. आता गणपती येत आहेत. त्यामुळे सगळ्या नागरिकांना खरेदी विक्रीकरिता प्रवास करावा लागतो. त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांनी संप करू नये. आपण सकारात्मक चर्चेतून मोठमोठे प्रश्र्न सोडवले आहेत. हा प्रश्र्नदेखील चर्चेतून सुटेल, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# अखेर सिद्धार्थ खरात यांचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश

## विधानसभेत दोन शिवसैनिक येणार समोरासमोर..?

### मंत्रालयातील सहसचिवाने नोकरी सोडली, आता बुलढाण्यातील 'या' मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार?







दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : राज्यात विधानसभा निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर आता राजकीय घटनांना वेग आला आहे. कुठल्या विधानसभा मतदारसंघातून कशी रणनीती आखायची, कोणाला उमेदवारी द्यायची अशा असंख्य घटना राज्यात घडत असताना स्वेच्छानुववृत्त मंत्रालयीन सहसचिव सिद्धार्थ खरात हे दि.३ सप्टेंबर रोजी शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला आहे.

एक जुलैला स्वच्छ निवृत्ती घेतल्यानंतर आता राजकारणात येण्याचा मार्ग त्यांनी स्वीकारलाय. विदर्भाच्या मेहकर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास ते इच्छुक असल्याची माहिती आहे. त्यामुळे आता कोणता नव राजकीय समीकरण बुलढाण्यातून समोर येणार अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर एक जुलैला मंत्रालयीन कारभारातून स्वेच्छा निवृत्ती घेत मंत्रालयाचे स्वेच्छानिवृत्त सहसचिव सिद्धार्थ खरात आज उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत मातोश्रीत दुपारी शिवसेना ठाकरे गटात प्रवेश घेतला आहे.

**सिद्धार्थ खरात कोण?**

स्वच्छ निवृत्त मंत्रालयीन सहसचिव सिद्धार्थ खरात यांनी उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच ग्रामविकास गृह विभाग या विभागांमध्ये सहसचिव म्हणून काम केलं असून राज्यमंत्री कॅबिनेट मंत्री व केंद्रीय राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव म्हणूनही त्यांनी काम केले आहे.

**बुलढाण्यातील मेहकर जागा कोणाची?**

बुलढाण्यातील मेहकर विधानसभेचे जागा गेल्या दहा वर्षांपासून काँग्रेसची आहे. त्यामुळे ठाकरे गटाकडून विधानसभेच्या मेहकर मतदार संघासाठी स्वेच्छानिवृत्त सिद्धार्थ खरात यांना उमेदवारी मिळणार का याकडे सर्वांचे लक्ष आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत मेहकर विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचे डॉ.संजय रायमुलकर यांनी काँग्रेसच्या अनंत वानखेडे यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला होता. या निवडणुकीत संजय रायमुलकर यांना १ लाख १२ हजार ०३८ मते पडली होती. तर दुसऱ्या क्रमांकावरील अनंत वानखेडे यांना ४९ हजार ८३६ मते मिळाली होती. आता मात्र मेहकर विधानसभेची जागा ही शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांना स्वप्नात असल्याचा बोलला जात असून दोन शिवसैनिक समोरासमोर येण्याची दाट शक्यता असल्याचे बोलल्या जात आहे. सिद्धार्थ खरात यांनी मातोश्रीवर प्रवेशा दरम्यान.अरविंद सावंत , खासदार , विनायक राऊत माजी खासदार , प्रा. नरेंद्र खेडेकर , आशिष रहाटे , आकाश घोडे सह जिल्ह्यातील शेकडो शिवसैनिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास इच्छुक असून बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर विधानसभा मतदारसंघात शिंदे गटाला हे चॅलेंज असणार की नाही याची उत्सुकता आहे. सध्या मेहकर विधानसभेत शिवसेना शिंदे गटाचे डॉक्टर. संजय रायमूलकर आमदार आहेत.

## समरजित घाटगे शरद पवार गटात दाखल!



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी** : भाजप नेते समरजित घाटगे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार गटात प्रवेश केला आहे. मंगळवार, ३ सप्टेंबर रोजी शरद पवारांच्या उपस्थितीत कागलमध्ये हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. या पक्षप्रवेशानंतर शरद पवार गटाची जाहीर सभा पार पडली.

याप्रसंगी बोलताना समरजित घाटगे म्हणाले की, येत्या काळात कागलमध्ये परिवर्तन घडवण्याची आज मुहूर्तमेढ झाली आहे. आपण हा निर्णय कागलच्या भविष्यासाठी घेतला आहे. कोणाला पाडण्यापेक्षा या मतदारसंघात विजय मिळवण्यासाठी आपण हा निर्णय घेतला. यापुढे शरद पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली आपण काम करणार आहोत. त्यांच्या आशीर्वादामुळे आपल्याला दहा हत्तींचं बळ मिळालं आहे. पुढचे दोन महिने लोकांमध्ये जाऊन त्यांच्यापर्यंत शरद पवार साहेबांचा संदेश पोहोचवायचा आहे. तसेच कागल विधानसभेत सुराज्य निर्माण करायचं आहे, असे ते म्हणाले.

## थोरातांचीही लेक विधानसभेच्या मैदानात?; प्रणिती शिंदेच्या वक्तव्याने संगमनेरकरांच्या भुवया उंचावल्या

**संगमनेर/प्रतिनिधी** : पुढची निवडणूक जयश्री थोरात यांनी लढावी, असे वक्तव्य खासदार प्रणिती शिंदे यांनी काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या समोरच केल्याने राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगली आहे. संगमनेर येथे काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वात इंदिरा महोत्सव घेण्यात आला. यावेळी प्रणिती शिंदे बोलत होत्या. प्रणिती शिंदे म्हणाल्या की, बाळासाहेब थोरात यांच्या शब्दापुढे मी जाऊ शकत नाही. संगमनेरला आल्यावर घरी आल्यासारखे वाटते. सोलापूर माझे गाव असले तरी संगमनेर माझ्यासाठी घरच आहे. गृहिणी खूप हुशार आहेत. मात्र त्यांच्या उत्पादनांना मार्केट आता उभे राहिले आहे. महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. महिला एकत्रित आल्या तर शक्तीपीठ निर्माण होते, असे त्यांनी म्हटले आहे.

CMYK

## साथीचे आजार टाळण्यासाठी खबरदारी गरजेची

राज्याला पावसाने चांगलेच झोडपल्याने राज्यात सध्या साथीच्या आजाराने डोके वर काढले आहे. डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासारख्या साथीच्या आजाराने राज्यातील नागरिक हैराण झाले आहे. साथीच्या आजाराने रुग्णांची संख्या वाढत चालल्याने आरोग्य विभागाची डोकेदुखी वाढली आहे. राज्यात डेंग्यू, मलेरिया आणि चिकणगुणियाचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळत आहे विशेषतः राज्यातील महापालिका क्षेत्रात मुंबई मध्ये डेंग्यू आणि मलेरियाचे, गडचिरोली जिल्ह्यात मलेरिया आणि कोल्हापूर जिल्ह्यात डेंग्यूचे सर्वाधिक रुग्ण आहे. नागपूरसह संपूर्ण विदर्भात देखील डेंग्यूचे रुग्ण आढळत आहे. पुण्यातही जवळपास तीच परिस्थिती आहे त्यामुळे आरोग्य खाते अलर्ट मोडवर आले आहे. मागील काही दिवसांपासून विशेषतः पावसाला सुरवात झाल्यापासून साथीच्या आजाराने डोके वर काढायला सुरवात झाली आहे. डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासोबतच सर्दी, खोकला, डोकेदुखी, ताप, शिंका येणे यानेही नागरिक त्रस्त झाले आहेत. चार वर्षांपूर्वी राज्यातच नव्हे तर संपूर्ण जगात कोरोनाने हाहाकार उडवला होता. कोरोना देखील संसर्गजन्य रोग होता त्यातून आपण आता कोठे सावरलो आहोत तोच आता या साथीच्या आजाराने डोके वर काढले आहे अर्थात हे साथीचे आजार कोरोना इतके धोकेदायक नसले तरी त्याकडे दुर्लक्ष करणे ही मोठी चूक ठरू शकते म्हणूनच आरोग्य खात्याने ही साथ मोडून काढण्यासाठी कंबर कसली आहे. ही साथ अधिक वाढू नये म्हणून आरोग्य खाते सर्वो तोपरी प्रयत्न करीत आहे. आरोग्यखाते त्यांची जबाबदारी पार पाडतच आहे पण आरोग्य खात्यासोबतच नागरिकांनी आणि प्रशासनाने देखील ही साथ आणखी वाढू नये यासाठी याबाबत काळजी घ्यायला हवी. वास्तविक दरवर्षी पावसाळा सुरू झाला की साथीचे आजार पसरतात पण ते पसरू नये यासाठी पावसाळ्यापूर्वीच खबरदारी घेतली जात नाही. या साथीबाबत नगरपालिका असो की महानगरपालिका उदासीनच दिसून येते. दरवर्षी कचऱ्याचे ढीग, घाणीचे साम्राज्य, सांडपाण्याचे डबके यांचे वेळीच सर्वेक्षण केले जात नाही. त्यामुळे शहरात जागोजागी असलेले कचऱ्याचे ढीग, सांडपाण्याचे डबके, आणि घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसते. याची वेळीच विल्हेवाट लावली गेली असती तर आज ही वेळ आली नसती. डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासारखे साथीचे आजार हे डासांमुळे होतात. ज्या ठिकाणी घाणीचे साम्राज्य असते अशा ठिकाणी डासांची उत्पत्ती होते. शहरातील हे घाणीचे साम्राज्य कमी झाले की डासांचे प्रमाणही कमी होईल. प्रशासनाने शहरातील घाणीचे साम्राज्य कमी करण्यासाठी तसेच शहरात कचऱ्याचे ढीग पसरू नयेत यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करायला हवेत. तसेच शहरात सर्वत्र औषध फवारणी करावी. डेंग्यूला कारणीभूत ठरणारा एडिस इजिप्ती हा डास गोड्या पाण्यात राहतो. डेंग्यूचे डास पसरू नयेत यासाठी नागरिकांनीही काळजी घ्यावी. नागरिकांना आपल्या घराच्या परिसरात, छतावर, भांड्यामध्ये, जुन्या वस्तूंमध्ये पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. आपल्या घराचा परिसर स्वच्छ राहील याची काळजी सर्व नागरिकांनी घ्यावी. आठवड्यातील एक दिवस कोरडा दिवस पाळावा. याशिवाय नागरिकांनी सकस आहार घेणे, भरपूर पाणी पिणे, ज्यूस पिणे, नियमित व्यायाम करणे, अराम करणे, पुरेशी झोप घेणे आवश्यक आहे. कोणताही आजार किरकोळ आजार आहे असे समजून अंगावर काढणे धोकादायक ठरू शकते. नागरिकांनी आजाराची लक्षणे दिसताच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. नागरिकांनी वैयक्तिक स्वच्छतेपासून सार्वजनिक स्वच्छतेपर्यंत विशेष काळजी घ्यावी. सरकारने प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, सोशल मीडियाद्वारे याबाबत जनजागृती करावी. शाळा महाविद्यालयातही याबाबतीत प्रबोधन करावे. वैयक्तिक, सामूहिक व शासकीय पातळीवर व्यापक प्रयत्न करूनच साथीच्या आजाराशी दोन हात करता येईल.

# ई-गव्हर्नन्समुळे 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेची रक्कम कमी वेळेत थेट खात्यात जमा होणे शक्य - मुख्यमंत्री

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/ प्रतिनिधी** : ई–गव्हर्नन्स हे फक्त तंत्रज्ञान नसून लोकांची विचार प्रवृत्ती बदलण्याचे माध्यम आहे. यामुळे पारदर्शकता येत असून सामान्य नागरिकांमध्ये प्रशासनाबाबत विश्र्वास निर्माण होतो. 'मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण' या योजनेच्या पहिल्या दोन हप्त्याची रक्कम अतिशय कमी वेळेत थेट लाभार्थ्यांच्या खात्यात केवळ ई–गव्हर्नन्समुळे शक्य झाल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले.

ई–गव्हर्नन्सविषयक २७ व्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन मुंबई येथे करण्यात आले. विकसित भारत : सुरक्षित आणि शाश्र्वत ई सेवा वितरण अशी संकल्पना असलेल्या या दोन दिवसीय




परिषदेचा शुभारंभ मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, मुख्य सचिव सुजाता सौनिक, केंद्रीय सचिव व्ही. श्रीनिवास, केंद्रीय सचिव एस.कृष्णन, केंद्रीय अतिरिक्त सचिव पुनीत यादव, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन नैनुटिया, धोरणकर्ते, पुरस्कार विजेते, देशभरातील प्रतिनिधी, विविध राज्यातील शासकीय अधिकारी, तज्ज्ञ उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, महाराष्ट्रात घराची खरेदी–विक्री संदर्भातील मालमत्तेची नोंदणी ही कोणत्याही उपनिबंधक कार्यालयात करणे शक्य झाले आहे. सुशासनबाबत बोलताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या किमान सरकार, कमाल प्रशासन या वाक्याची आठवण होते. भविष्यात मालमत्ता खरेदी विक्री ही ऑनलाईन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. आता मुख्यमंत्री सचिवालयात ई–ऑफिसद्वारे संपूर्ण फायलिंगचे काम होते. भविष्यात मंत्रालयातील कामे ई ऑफीसद्वारे होणार आहेत. राज्यात सेवा अधिकारांतर्गत सर्व सेवा ऑनलाईन पुरविण्यात येत आहेत. मंत्रालयाच्या प्रवेशद्वाराजवळ केंद्रीय नोंदणी केंद्र सुरू केले असून येथे सर्व पत्रे स्वीकारली जात आहेत. यामुळे लोकांचे श्रम आणि वेळ यांची बचत होते. याचदृष्टीने आगामी काळात मुंबई, नवी मुंबई येथे डेटा सेंटर हब बनण्याच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. यासाठी आपल्याकडे उत्तम कुशल मनुष्यबळ असून तंत्रज्ञान आता ग्रामीण भागापर्यंत पोहोचवले असल्याचे मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी सांगितले.

ई गव्हर्नन्स प्रणाली राबविणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असून शासनाने माहिती तंत्रज्ञान धोरण तयार केले आहे. आता ए.आय. या तंत्रज्ञानाचा वापर उद्योग, कृषी, आरोग्य या क्षेत्रात केला जाणार आहे. प्रशासकीय कामात गती देण्याबरोबरच सर्वसामान्य जनतेला पारदर्शक न्याय मिळाला पाहिजे. भविष्यात प्रशासन अधिक प्रतिसादात्मक, सर्वसमावेशक आणि नागरिक केंद्रित होत असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

यावेळी मुख्यमंत्र्याच्या हस्ते कळ दाबून सामान्य प्रशासन विभागाच्या प्रशासकीय सुधारणा, रचना व कार्यपद्धती याचे नाव बदलण्यात आले असून ते आता नाव प्रशासकीय नाविन्यता, उत्कृष्टता आणि सुशासन असे करण्यात आले.

# सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आज विविध पुरस्कारांचे मुंबईत वितरण

## 'गौरव महासंस्कृतीचा' नृत्य नाटिका, संगीत, हास्यविनोद कलाविष्कार सादरीकरणाचा सांस्कृतिक कार्यक्रम

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/ प्रतिनिधी** :सांस्कृतिक कार्य विभागातर्फे विविध कलाकारांना जीवनगौरव पुरस्कार व अन्य पुरस्कारांचे वितरण दरवर्षी करण्यात येते. यंदा हा पुरस्कार सोहळा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मंत्रालयासमोर, मुंबई येथे बुधवार, दिनांक ४ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६:३० वाजता आयोजित केलेला आहे.

सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत सर्व पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

या कार्यक्रमांमध्ये ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार २०२४ हा ह.भ.प. संजय महाराज पाचपोर यांना प्रदान करण्यात येणार असून भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कार २०२४ हा विदुषी आरती अंकलीकर यांना, नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार २०२४ हा पुरस्कार ज्येष्ठ रंगकर्मी प्रकाश बुद्धीसागर यांना तर संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार २०२४ श्रीमती शुभदा दादरकर यांना तसेच तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर लोककला जीवनगौरव पुरस्कार २०२३ हा श्रीमती शशिकला झुंबर सुक्रे तर २०२४ वर्षाचा जनार्दन वायदंडे यांना प्रदान करण्यात येणार आहे.

याचबरोबर राज्य सांस्कृतिक पुरस्कार २०२४ मध्ये नाटक क्षेत्रासाठी श्रीमती विशाखा सुभेदार, उपशास्त्रीय संगीत डॉ.विकास कशाळकर, लोककला क्षेत्रासाठी अभिमन्यू धर्माजी सावदेकर, शाहिरी क्षेत्रासाठी शाहीर राजेंद्र कांबळे, नृत्य क्षेत्रासाठी श्रीमती सोनिया परचुरे, कीर्तन समाज प्रबोधन क्षेत्रासाठी संजय नाना धोंडगे, वाद्य संगीत क्षेत्रासाठी पांडुरंग मुखडे, कलादान क्षेत्रासाठी नागेश सुर्वे, तमाशा क्षेत्रासाठी कैलास मारुती सावंत, आदिवासी गिरीजन क्षेत्रासाठी शिवराम शंकर घुटे यांना प्रदान करण्यात येणार आहे.

या समारंभाप्रसंगी गौरव महासंस्कृतीचा हा नृत्य नाट्यसंगीत हास्यविनोद कलाविष्काराचे सादरीकरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमामध्ये अजित परब, संज्योती जगदाळे, केतकी भावे – जोशी, अरुण कदम, श्याम राजपूत, भार्गवी चिरमुले, विकास पाटील आणि शाहीर शुभम विभुते यांच्यामार्फत सादरीकरण होणार आहे.

या कार्यक्रमाची संकल्पना सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांची असून मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा अपर मुख्य सचिव सांस्कृतिक कार्य विकास खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सर्वांसाठी हा कार्यक्रम विनामूल्य असून जास्तीत जास्त नागरिकांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

## बहुजन समाज पार्टी जालना शहराध्यक्षपदी सिध्दार्थ मोरे तर शहर प्रभारी राम जोहरे यांची नियुक्ती

दैनिक आपला विदर्भ

**जालना/ प्रतिनिधी** : साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंती निमित्त दिनांक ११ ऑगस्ट २०२४, रोजी, सर्व्हे नं. ४८८ रेस्ट हाऊस, अंबड चौफुली जालना येथे सकाळी ११ वाजेपासून कॅडर कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बहुजन समाज पार्टी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुनील डोंगरे यांच्या आदेशावरून जालना शहरातील पदाच्या नियुक्त्या खालीलप्रमाणे करण्यात आल्या.

बहुजन समाज पार्टी जालना जिल्हा अध्यक्ष चंद्रमणी गाडेकर यांच्या नेतृत्वाखाली जालना शहराध्यक्षपदी सिध्दार्थ मोरे तर जालना शहर प्रभारी राम जोहरे, जालना शहर उपाध्यक्ष कैलास जाधव, शहर महासचिव अशोक चांदोडे, शहर कोषाध्यक्ष गिरधारी लोंढे, शहर सचिव शेख रऊफ, यांची नियुक्ती करण्यात आली. या नियुक्ती बाबत जिल्हाप्रभारी जयकुमार भालमोडे, जालना विधानसभा अध्यक्ष राहुल करणाडे, विनोद बिरसोने, संजय खरात, फेरोज भाई, बोल्डे सर, धनराज डोंगरे, कुलदीप चांदोडे, भैय्यासाहेब साळवे, किशोर बोर्डे, इरफान बागवान, विजय भगत व जालना जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या.

# रावसाहेब दानवेंची मका पार्टी; विस्तवावर मराठवाडी गमजा फिरवत कणसं भाजत लुटला आस्वाद

दैनिक आपला विदर्भ

**जालना/ प्रतिनिधी** : माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे अनेक वेळा राजकारणा व्यतिरिक्त आपल्या वेगवेगळ्या कृतीतून माध्यमांचे लक्ष वेधून घेत असतात पावसाच्या उघडीपीनंतर शेतकऱ्यांनी आग्रह केल्यानंतर त्यांना मका भाजून खाण्याची इच्छा झाली लगेचच दानवेंनी स्वतःहून मका भाजून आपल्या सहकाऱ्यांना खाऊ घातला आणि स्वतः देखील त्याचा आस्वाद घेतला

जालना जिल्ह्याच्या दौरा करताना त्यांनी भोकरदन तालुक्यातील वरुड गावात शेतकरी आणि गावकऱ्यांशी आपल्या स्टाईलमध्ये गप्पा मारत कणसाचा आस्वाद लुटला

कणीस भाजताना विस्तव विजू नये म्हणून मराठवाडी गमजानं गरागरा हात फिरवत दानवेंनी कणसं भाजली. पावसानं उघडीप दिल्यानं वातावरणात काहीसा गारवा होता. कार्यकर्त्यांशी गप्पा मारत दानवेंनी कणीस खात आनंद लुटला.



## भीषण! मराठवाड्यात दोन दिवसात पावसानं १२ ठार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/ प्रतिनिधी**

मराठवाड्यात मागील दोन दिवसात बेफाम पावसाने १२ ठार झाले आहे. पावसानं दाणादाण उडाली असून परभणी, हिंगोली, नांदेड जिल्ह्यात ५ लाख ८ हजार ६८ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहेत. गेल्या दोन दिवसात अर्ध्याहून अधिक महसूलमंडळात अतिवृष्टीची नोंद करण्यात आली असून पुरात वाहून, पाण्यात बुडून तसेच वीज पडल्याने १२ जणांचा मृत्यू झाला आहे.

मराठवाड्यात मागील ४८ तासांपासून मुसळधार पावसामुळे ओढे आणि नद्यांना पूर आलाय. शेतात पाणी घुसल्याने पिकांचे नुकसान झालंय. नद्यांना पूर आल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. घरांची पडझड झाली आहे. बीड नांदेड परभणी लातूर जिल्ह्यात रात्रीपासून पावसाचा जोर कायम आहे. सखल भागात पाणी हळूहळू शिरल्याने नागरिकांची तारांबळ उडाली आहे. ढगफुटीसदृश्य झालेल्या पावसानं रौद्ररूप धारण केला असून जनजीवन विस्कळीत झाले आहे.

६ लाखाहून अधिक शेतकरी बाधित

मराठवाड्यात पावसाच्या कोसळधारांनी शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आले आहे. ४ लाख ९६ हजार ३९२ हेक्टर जिरायत क्षेत्राचे नुकसान झाले असून ११ हजार ४९७ बागायत हेक्टर पावसानं नासलं आहे. सहा लाखांहून अधिक शेतकरी पावसाच्या पाण्यानं बाधित झाले आहेत. दोन दिवसाच्या पावसात १२ जणांचा मृत्यू झाला आहे. यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १ जालना २ हिंगोली, बीड, लातूर जिल्ह्यात प्रत्येकी एक जण मृत झाला असून कालच्या पावसात ही आकडेवारी वाढून १२ वर गेली आहे.

मराठवाड्यातील १ हजार ४५४ गावांमध्ये नुकसान झाले असून १६९ जनावरे दगावली असून ६२१ पुराच्या पाण्याने नुकसान झाले आहे. मुसळधार पावसानं अनेक गावांना पुराचा वेढा लागला असून अनेक नदीकाठची गावं पाण्याखाली गेल्याचं चित्र आहे. नांदेड जिल्ह्यात गेल्या ३६ तासांमध्ये पावसाचा जोर कायम असून अजूनही पाऊस सुरू आहे. जिल्ह्यातील २६ मंडळामध्ये अतिवृष्टी झाली असून जिल्ह्यातील सर्व प्रकल्पातून पाणी सोडले जात आहे. नदी नाले ओसंडून वाहत असून नागरिकांनी सतर्क राहण्याचा इशारा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिला आहे. जिल्ह्यात अतिवृष्टीमध्ये १२ जनावरे मृत्युमुखी पडली असून २१ घरांची अंशतः पडझड झाली आहे.

# मुसळधार पावसामुळे झालेल्या नुकसानाचे ताबडतोब पंचनामे करावेत - मुख्यमंत्री शिंदे

## आपदग्रस्तांना तातडीने मदत उपलब्ध करून देण्यात यावी; मुख्यमंत्र्यांच्या विभागीय, जिल्हा प्रशासनाला सूचना

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/ प्रतिनिधी** विशेषतः मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. यासह मुसळधार पावसामुळे नुकसान झालेल्या विदर्भासह इतर भागातील जिल्हे किंवा तालुक्यांमध्ये पंचनामे आणि मदतीची कार्यवाही त्वरित करण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

पिकांचे झालेले नुकसान, घरांची पडझड, पशुधनाची हानी अशा सर्व बाबींची माहिती घेण्यात यावी, त्वरित पंचनामे करण्यात यावेत. अतिवृष्टीमुळे तात्पुरते स्थलांतर केलेल्या लोकांना सर्व आवश्यक सुविधा देण्यात याव्यात. त्यांना आवश्यक ती सर्व मदत त्वरित उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना दिल्या आहेत.

विभागीय आयुक्त, जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, स्थानिक नगरपालिका, महानगरपालिका,



ग्रामपंचायती, पोलीस प्रशासन आदी सर्वांनी समन्वयाने यासाठी कामकाज करावे, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

आपत्ती व्यवस्थापन कक्ष २४ तास खुला ठेवावा, याद्वारे मदत आणि पुनर्वसनाचे सनियंत्रण करावे, स्थलांतर केलेल्या लोकांसाठी चांगल्या दर्जाचे तात्पुरते निवारे उभे करावेत, त्यांना कपडे, अन्न शुद्ध पाणी, औषधे इत्यादी जीवनावश्यक वस्तूंचा ताबडतोब पुरवठा करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिले आहेत.

पाटबंधारे विभाग, हवामान खाते यांच्याशी समन्वय ठेवून लोकांना आवश्यक माहिती त्वरित द्यावी. आपतग्रस्त लोकांच्या मदतीसाठी आपत्कालीन हेल्पलाइन आणि कंट्रोल रूम त्वरित कार्यरत करावी. विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता शाळा आणि महाविद्यालयांसंदर्भात स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने निर्णय घ्यावेत. त्याचबरोबर पाऊस परिस्थिती, बाधित क्षेत्र, धरणांमधील पाणी पातळी, स्थलांतरित लोकांची संख्या, झालेल्या नुकसानीची माहिती इत्यादी माहिती त्वरित वेळोवेळी सादर करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिल्या आहेत.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्या- ॲड. जयश्रीताई शेळके

## शेकडो शेतकऱ्यांसह तहसीलदार यांना दिले निवेदन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : मोताळा तालुक्यातील सततच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करुन शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहिर करावी मागील दोन दिवसांपासून मोताळा तालुक्यात सतत पाऊस सुरु आहे मोताळा तालुक्यात कपाशी, सोयाबिन, मका, मूग उडिद या पिकांची विपुल प्रमाणात लागवड केली जाते परंतु मुसळधार पावसामुळे शेतांमध्ये पाणी साचल्याने या सर्व पिकांचे खूप मोठ्या प्रमाणत नुकसान झाले आहे ज्यामुळे शेतमालाचे नुकसान होऊन शेतकऱ्यां च्या हातातोंडाशी आलेला घास हिसकावला गेला आहे वाढलेली महागाई, निसर्गाचा प्रकोप, शेतमालाला मिळणारा कमी भाव यामुळे शेतकरी आधीच त्रस्त आहेत. शेतीची मशागत, पेरणी, खत–बियाणे तसेच अनेक वेळा दुबार पेरणी करावी लागते यातच शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. एवढं करुनही शेतमाल विकून मुबलक पैसा हातात येईलच याची शाश्र्वती नसते. मागील वर्षीच्या नुकसानीची मदत शेतकऱ्यांना मिळाली नाही तसेच मोठ्या प्रमाणात ज्यावेळी शेतकरी बांधवांनी आंदोलन



केले त्यावेळी पिकविम्याची रक्कम शेतकऱ्यांना देण्यात आली त्यातही मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले अनेक शेतकरी बांधव अद्यापही या मदतीपासून वंचित आहेत आधीच शेतमालाल भाव अपेक्षित बाजारभाव मिळत नाहीत. सोयाबिनचे बाजारभावही खूप मोठ्या प्रमाणात कमी झाले आहेत, आताही कापणीवर आलेल्या पिकाचे मागील दोन दिवसांपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे नुकसान्झाल्याने शेतकऱ्यांना खूप मोठा आर्थिक फटका बसला आहे सततच्या पावसामुळे झालेल्या शेतमालाच्या नुकसानीची पाहणी करुन शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळणे अत्यावश्यक तसेच शासनाने ई पीक पाहणीची सुविधा उपलब्ध करुन दिलेली असूनही अनेक वेळा तांत्रिक अडचणी येतात. बऱ्याचदा साईट बंद असते त्यामुळे नुकसान होऊनही पीक पाहणीची नोंद घेणे तांत्रिकतूया शक्य होत नाही. बहुदा पिक पाहणीचा सव्र्हे करण्यासाठी एजन्सीची नियुक्ती केली जाते संबंधित एजन्सीमार्फत अनेकदा योग्य पद्धतीने ई पीक पाहणी केली जात नाही. त्यामुळे आपल्या स्तरावरुन नुकसानीचा सर्व्हे करुन शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत देणे अत्यावश्यक आहे. तरी आपण आपल्या स्तरावरुन प्रशासनाला मोताळा तालुक्यातील नुकसान पाहणीचे आदेश द्यावेत व नुकसानग्रसस्त शेतकऱ्यांना शासनाच्या माध्यमातून तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी ॲड.जयश्रीताई शेळके सचिव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी सह शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनाच्या माध्यमातून केली आहे

## संक्षिप्त...

### गणेशोत्सवाच्या स्वागतासाठी साताराची बाजारपेठ सजली, नागरिकांकडून खरेदीसाठी मिळतोय उदंड प्रतिसाद



दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी** : अवघ्या काही दिवसांवरच येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवाच्या आगमनासाठी सातारकर आतुर झाले असून आपल्या लाडक्या गणरायाला उत्साहात आणि आनंदात घरात आणण्यासाठी काहीच दिवस असल्याने त्याच्या आगमनासाठी लागणाऱ्या खरेदीला देखील आता सातारच्या मुख्य बाजारपेठेत एकच गर्दी होऊ लागली आहे. गणरायाच्या आगमनासाठी साताऱ्यातील मुख्य बाजारपेठेत आता गणेशोत्सवासाठी लागणाऱ्या सजावट साहित्याची देखील मोठी रेलचेल इथे पाहायला मिळते. यामध्ये रंगीबेरंगी देखावे, आरास करण्यासाठी लागणारी इको फ्रेंडली फुले, गौरी सजावटीसाठी लागणारे दागिने त्याचबरोबर अनेक देखाव्याचे प्रकार देखील विक्रीसाठी उपलब्ध झाल्या असून याचीच खरेदी करण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने बाजारपेठेत दाखल झाले आहेत. साताऱ्यातील राजवाडा परिसरापासून खनआळी पर्यंत नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. गणेशोत्सवाच्या आगमनाला आता अवघे तीनच दिवस उरले असताना सातारच्या बाजारपेठेत नागरिकांचा उत्साह व जल्लोष भरभरून पाहायला दिसत आहे.

### मोबाईलचा हॉटस्पॉट न दिल्याने कोयत्याने वार करत मॅनेजरचा खून



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** : पुण्यात किरकोळ कारणावरून खुनाचे प्रकार वाढले आहे. हडपसर येथे मोबाइल हॉटस्पॉट न दिल्याने चौघांनी रात्री शतपावली करण्यासाठी गेलेल्या एका मॅनेजरची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी कोणतेही धागेदोरे नसतांना चार आरोपींना अटक केली आहे.वासुदेव रामचंद्र कुलकर्णी (वय ४७, रा. उत्कर्षनगर, हडपसर) असे खून झालेल्यांचे नाव आहे. या प्रकरणी कुलकर्णी यांचे भाऊ विनायक (वय ५२) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तर मयूर भोसले (वय २० रा. वेताळबाबा वसाहत , हडपसर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. इतर तिघांची नावे अद्यापही समजू शकली नाही.

### कामोठे मधील एका नुडल्स आणि सॉस बनवणाऱ्या कंपनीचा मनसेने केला पर्दाफाश






**नवी मुंबई/प्रतिनिधी** : कामोठे इंडस्ट्रीयल इस्टेट मधील एका नुडल्स आणि सॉस बनवणाऱ्या कंपनीचा मनसेने पर्दाफाश केला आहे. या कंपनीची स्थिती ही अत्यंत भयावह आहे. ज्या ठिकाणी हे नुडल्स आणि सॉस बनवले जातात ते ठिकाणी संपूर्ण अस्वच्छता पसरली आहे. अक्षरशः गटारात नुडल्स आणि सॉस बनविले जातात तसेच रात्रीच्या अंधारात अशी कामे केली जातात. आज मनसेने या कंपनीवर धाड टाकत या कंपनीचा पर्दाफाश केला आहे.

### शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी उद्यापासून सिंदखेडराजात बेमुदत अन्नत्याग आंदोलन करणार- रविकांत तुपकर

**डोणगाव/प्रतिनिधी** : संपूर्ण राज्यात अतिवृष्टी व



ढगफुटीमुळे झालेल्या शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे– सरकारने शेतीच्या नुकसानीची व जनावरांच्या जीवितहानीची १००% नुकसान भरपाई द्यावी अशी आमची मागणी आहे सोयाबीन–कापूस दरवाढ, पिकविमा, नुकसान भरपाई, संपूर्ण कर्जमुक्ती सह शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी उद्यापासून सिंदखेडराजात बेमुदत अन्नत्याग आंदोलन करणार आहे असल्याचे रविकांत कल्याणी म्हटले आहे

## जिजामाता विद्यालयाचे चार विद्यार्थी जिल्हास्तरावर

दैनिक आपला विदर्भ


**मालेगाव** : क्रीडा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा कार्यालय वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने मालेगाव तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेसाठी जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पांगरी नवघरे च्या १४ वर्षे सतरा वर्ष व १९ वर्ष विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला यामध्ये विद्यालयाचे चार विद्यार्थी ची निवड जिल्हास्तरीय स्पर्धे साठी झाली आहे.त्यामध्ये १४ वर्षे वयोगटांमध्ये प्रियंका काठोळे, सतरा वर्ष वयोगटांमध्ये ज्ञानेश्र्वरी काकडे, व १९ वर्षे




वयोगटांमध्ये शिवशंकर नवघरे व सानिका कालापाड यांची निवड जिल्हास्तरीय स्पर्धेत झाली आहे या स्पर्धेत विद्यालयाचे एकूण चार विद्यार्थी बुद्धिबळ स्पर्धेत पात्र ठरले आहेत. यासाठी विद्यालयाचे क्रिडाशीक्षक विलास खराटे यांनी परिश्रम घेतले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष तथा माजी आ. विजयराव जाधव, उपाध्यक्ष सुनील जाधव, सचिव रंगनाथ पांडे, संचालक राम जाधव, अंजिक्य जाधव यांनी अभिनंदन केले आहे. तर या विद्यार्थ्यांचा विद्यालयात सत्कार घेण्यात आला. यावेळी प्राचार्य राधेश्यााम घुगे, नवनाथ मुठाळ, प्रा. गोकुळ राठोड, प्रा.सं तोष वाझुळकर, प्रा. पंकज ईश्र्वरे, परमेश्र्वर वाळूकर, रामेश्र्वर मानवतकर, गणेश बाजड, गणेश भरडे, रवी जंजाळकर, वैशाली धंदरे, अनंत जहागीरदार, संदीप देशमुख, बळीराम नवघरे, मोहन शिरसाट यांचा समावेश होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश वाझुळकर यांनी तर आभारप्रदर्शन उमेश लहाने यांनी केले.

## गणेशोत्सव मिरवणुकीतील लेझर लाईटवर बंदी तर डॉल्बीला डेसीबलची मर्यादा





दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी** : गणेशोत्सव मिरवणूकीमध्ये लेझर लाईट लावून नागरिकांच्या डोळ्यांना त्रास देण्याचा सुरू असलेला प्रयत्न आता यापुढे साताऱ्यात चालणार नाही, असे ठणकावून सांगत साताऱ्यातील मिरवणुकीमध्ये यापुढील काळात कोणतीही लेझरची लाईट लावल्यास त्याच्यावर तात्काळ गुन्हे दाखल केले जातील. तर डॉल्बी सिस्टीमची डेसिबल मर्यादा ओलांडणाऱ्यावर देखील गुन्हे दाखल करण्याचे आदेश सातारा पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी दिले आहेत. त्यामुळे आगामी गणेशोत्सवाच्या काळात सातारा जिल्ह्यामध्ये लेझर लाईटला बंदी घालण्याचा निर्णय सातारा पोलिसांनी घेतला आहे. तर डेसिबलची मर्यादा ओलांडणाऱ्या डॉल्बी सिस्टीम वर देखील आता गुन्हे दाखल होणार आहेत.

## एकनाथ खडसेंनी सुनेला लोकसभेत पोहोचवलं, आता मुलीसाठी सोयीस्कर राजकारण; चंद्रकांत पाटलांचा टीकेचा बाण

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी** : गेल्या काही दिवसांपासून एकनाथ खडसे हे नक्की शरद पवारांच्या राष्ट्रवादीत की भाजपमध्ये आहेत? असा चर्चा रंगल्या आहेत. त्यातच जे पी नड्डा यांच्या उपस्थितीत माझा भाजपा प्रवेश करण्यात आला. मात्र, त्याला खालील लोकांनी विरोध केल्याने तो जाहीर होऊ शकला नाही, असा गौप्यस्फोट ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी केला आहे. यावरून आता मुक्ताईनगरचे आमदार चंद्रकांत पाटील यांनी एकनाथ खडसेंवर निशाणा साधला आहे. एकनाथ खडसे हे रंग बदलणारे सरपटणारे प्राणी असल्याची टीका आमदार चंद्रकांत पाटील यांनी एकनाथ खडसेंवर नाव न घेता केली आहे.

लोकसभा निवडणुकीआधीच एकनाथ खडसे यांनी पत्रकार परिषद घेत मी भाजपमध्ये पक्ष प्रवेश करणार असल्याचे जाहीर केले होते. मात्र लोकसभा निवडणूक होऊन देखील त्यांचा पक्ष प्रवेश रखडल्याचे दिसून आले. त्यातच काल एकनाथ खडसे यांच्या वाढदिवसाच्या बॅनरवर शरद पवारांचा फोटो पाहायला मिळाल्याने चर्चाना उधाण आले. काल पत्रकार परिषदेत एकनाथ खडसे यांनी माझा भाजपा प्रवेश झाला. मात्र, घोषणाच झाली नसल्याचा गौप्यस्फोट केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली.

चंद्रकांत पाटलांची एकनाथ खडसेंवर टीका

एकनाथ खडसेंच कुटुंबच संभ्रमात टाकणारं आहे. स्वत:च्या स्वार्थासाठी राजकारण करणारे एकनाथ खडसे आहेत. तीस वर्षात एकनाथ खडसेंनी कुठलाही विकास मतदारसंघात केला नाही. खडसे म्हणतात आज मी भाजपमध्ये उद्या राष्ट्रवादीमध्ये आधी सुनेला लोकसभेत पोहोचवले. त्यानंतर आता मुलीसाठी सोयीस्करपणे राजकारण करणारे एकनाथ खडसे आहेत, अशी घणाघाती टीका चंद्रकांत पाटील यांनी केली आहे.

## महायुतीच्या बाजून सर्वे येत नसल्याने निवडणूका पुढे ढकलल्या जातायत – प्रणिती शिंदे




दैनिक आपला विदर्भ

**अहमदगनर/प्रतिनिधी** : राज्यात अघोषित आणीबाणी सुरू असल्याचं काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी सांगितला आहे. विधानसभेसाठी जे सर्वे घेत आहेत त्याच्यामध्ये महायुतीला जागा मिळत नसल्याचं दिसून येत आहे. महायुती सरकारच्या काळात महाराजांच्या पुतळ्यांमध्ये भ्रष्टाचार करण्यात येतो आता कितीही योजना जरी आणल्या तरी सर्वसामान्य जनता महाविकास आघाडीच्या बाजूने ठामपणे उभी राहणार असल्याचं खासदार प्रणिती शिंदे यांनी संगमनेर येथे पत्रकारांशी वार्तालाप करताना सांगितले आहे.

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर चोपड्यातील पोलिस आणि शांतता कमिटीची यांची बैठक संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी** : गणेश उत्सव काही दिवसांवर आला आहे चोपडा शहरात गणेश उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो.

तसेच पाचव्या दिवशी बाप्पाचं विसर्जन होतं. यावर्षी गणेश मंडळांची संख्या वाढलेली आहे तसेच गणरायाच्या मूर्तीची उंची देखील वीस फुट ठेवण्याची परवानगी असल्याने गणेश भक्तांनी व प्रशासनाने





घ्यावयाची काळजी यासंदर्भात आज जळगाव पोलीस अधीक्षक माहेश्र्वरी रेड्डी यांच्या उपस्थिती शांतता कमिटीची बैठक संपन्न झाली.

या बैठकीत काही पदाधिकाऱ्यांनी आपल्या अडचणी मांडल्या तसेच नगरपालिका प्रशासन व महावितरण विभाग यांनी काही सूचना केल्या दिल्या.

या बैठकीला जळगाव पोलीस अधीक्षक माहेश्र्वरी रेड्डी, तहसीलदार भाऊसाहेब थोरात, पोलीस उपविभागीय अधिकारी कुणाल सोनवणे, नगरपरिषदेचे मुख्याध्यापक राहुल पाटील, महावितरणचे अधिकारी, पोलीस अधिकारी यांच्यासह गणेश मंडळाचे पदाधिकारी, शांतता कमिटीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## मशिदीत घुसण्याची भाषा करणाऱ्या नितेश राणेंना खासदार संजय राऊत यांचं सणसणीत प्रत्युत्तर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : भाजपाचे आमदार नितेश राणे यांनी काल एक प्रक्षोभक वक्तव्य केलं. त्याचे पडसाद राज्याच्या राजकारणात उमटत आहेत. रामगिरी महाराजांच्या विरोधात बोलाल, तर मशिदीत घुसून चून चून के मारेंगे असा इशारा नितेश राणे यांनी दिला.

त्यानंतर मशिदीकडे बघून गोळी झाडल्याचा इशारा केला. त्यावर ठाकरे गटाचे नेते, खासदार संजय राऊत यांना आज पत्रकार परिषदेत प्रश्न विचारला. प्रक्षोभक भाषण करणाऱ्या भाजपा आमदाराला अटक होत नाही, त्यावर संजय राऊत म्हणाले की, भाजपाच्या त्या आमदाराचे वडील आधी शिवसेनेत होते. नंतर काँग्रेसमध्ये गेले. आता भाजपात आहेत

आता हिंदुत्ववादी बनले आहेत. मशिदीत घुसून मारणार बोलतात. माझं मोदींना आवाहन आहे, अशा प्रकारची भाषा तुम्हाला मंजूर आहे का? मंजूर असेल, तर परदेशात जाऊन मशिदीत जाणं बंद करा. दुबई, सौदी अरेबिया आणि मलेशिया या इस्लामिक देशात जाऊन मोठमोठ्या नेत्यांची गळाभेट घेता, तिथे मशिदीत जाऊन धर्मनिरपेक्षतेचे धडे देता, हे ढोगं बंद करा अशी टीका संजय राऊत यांनी केली.

‘आधी पाकिस्तानात घुसा’



मशिदीत घुसून कोणी मारण्याबद्दल बोलत असेल, तर सरकारने काय केलं पाहिजे?. मशिदीत घुसण्याची भाषा करणाऱ्या त्या आमदाराने आपल्या सरकारला सांगितलं पाहिजे, आधी पाकिस्तानात घुसून दहशतवादाविरुद्ध युद्ध छेडा. जम्मूत आर्मी बेसवर हल्ला झाला. एक जवान शहीद झाला. हे छोटे लोक गावात जाऊन भाषणं करतात. त्यांना राज्यात दंगली घडवायच्या आहेत, राज्यात आग लावायची आहे असा आरोप संजय राऊत यांनी केला.

# १४४ वर्ष जुन्या ऐतिहासिक 'मारबत' उत्सवाला सुरुवात

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी : नागपूरमध्ये १४४ वर्ष जुन्या ऐतिहासिक, पौराणिक व तसंच धार्मिक महत्त्व असलेला 'मारबत' उत्सव सुरू झालाय. १४४ वर्षांपासून 'काळी मारबत' आणि १४० वर्षांपासून अविरतपणे प्रत्येक नागपूरकरांच्या श्रद्धास्थानी असलेली पिवळी 'मारबत' स्थानापन्न झालीय. पुढील काही हा दिवस 'मारबत' महोत्सव सुरू राहणार आहे. या उत्सवाकडं संपूर्ण देशाचं लक्ष लागलेलं असतं, कारण हा उत्सव केवळ नागपुरामध्येच साजरा केला जातो.**





'मारबत' उत्सव म्हणजे नागपूरला लाभलेला हा ऐतिहासिक वारसा आहे. काळी आणि पिवळी मारबत सध्या विराजमान झालीय. त्यांचं दर्शन घेण्यासाठी नागपूरचं नव्हे तर राज्यातील इतरही भागातून भाविक येऊ लागले आहेत. पोळा सणाच्या चार दिवसांपूर्वी पिवळी आणि काळी मारबतची स्थापना केली जाते. सध्या या दोन्ही मारबत विराजमान झाल्या असून त्यांचं दर्शन घेण्यासाठी भाविक आता गर्दी करू लागले आहेत. पिवळी मारबतीला देवीचं रूप म्हणून पुजलं जातं. काळी मारबत ही दुर्जनांचं प्रतीक असल्याची मान्यता आहे.

धावपळीच्या युगात आपल्याला आपल्याच संस्कृतीचा विसर पडतोय, असं असताना राज्याची उपराजधानी असलेल्या नागपुर शहरानं १४४ वर्षे जुन्या ऐतिहासिक परंपरेचं जतन केलंय. समाजातील अनिष्ट प्रथांचं उच्चाटन करण्याच्या हेतूनं बैल पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी मारबतीची मिरवणूक काढली जाते. काळी आणि पिवळी मारबतीसह बडगे तयार केले जातात. 'मारबत' म्हणजे वाईट रुढी– परंपरा, अंधश्रद्धेच दहन करणं आणि चांगल्या परंपरा, विचारांचं स्वागत करणं हा या मागचा एक उद्देश. कृष्णाचा वध करण्यासाठी आलेल्या पुतना मावशीचं प्रतीक 'काळी मारबत', तर लोकांचं रक्षण करणारी 'पिवळी मारबत' आहे. यांच्या दोन विशाल मूर्ती तयार केल्या जातात.

जगभरात प्रसिद्ध झालेला बडग्या–मारबत उत्सव व मिरवणूक हा प्रकार फक्त नागपुरात बघायला मिळतो. मारबत उत्सव म्हणजे नागपूरला लाभलेला ऐतिहासिक वारसा आहे. इंग्रजांची राजवट देशात असताना नागरिकांना एकत्र करण्यासाठी लोकमान्य टिळकांनी ज्या पद्धतीनं पुण्यात गणेशोत्सव सुरू केला, त्याच पार्श्र्वभूमीवर नागपुरातदेखील देखील 'मारबत' उत्सव सुरू करण्यात आला होता. 'मारबत' उत्सवाकडे गणेशोत्सवापेक्षा जुना उत्सव म्हणून पाहिले जातं. प्राचीन काळात अनेक रूढी परंपरा होत्या. त्या मानव जातीसाठी घातक ठरत असल्यानं त्या रूढी परंपरांचं उच्चाटन व्हावं, म्हणून देखील हा उत्सव साजरा केला जातो. 'मारबत' उत्सव साजरा करण्यामागं एक उद्धिष्ट आहे. ते म्हणजे, वाईट रूढी परंपरा व अंधश्रद्धेचा दहन करून चांगल्या परंपरा आणि विचारांचं स्वागत करणं.

नागपूरच्या जगनाथ बुधवारी भागात राहणाऱ्या तेली समाज बांधवांनी 'पिवळी मारबत' उत्सव १८८५ साली साजरा करण्यास सुरुवात केली. यावर्षी पिवळ्या मारबतीला १४० वर्ष पूर्ण झाले आहेत. लोकांच्या रक्षणासाठी पिवळी मारबतीची मिरवणूक काढली जाते. पिवळ्या मारबतीची मिरवणूक काढल्यानंतर तिचं दहन केलं जातं. विशेष म्हणजे, लहान मुलांना घेऊन महिला दर्शनासाठी येतात.

भोसले राजघराण्यातील बाकाबाई यांनी इंग्रजांसोबत हात मिळवणी केली होती. त्याविरोधात 'काळी मारबत' काढली जाते, त्याच बरोबर 'काळी मारबती'ला महाभारताचा संदर्भ देखील दिला जातो. आज काळी मारबत या परंपरेला १४४ वर्ष पूर्ण झाले आहेत.

## वृत्तविशेष...

### लग्नाचा बनाव रचून ठगणारी टोळी जेरबंद; धुळे पोलिसांची दमदार कारवाई



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** अविवाहित तरुणांना हेरुन लग्नाचा बनाव रचणाऱ्या टोळीला धुळ्यातील चाळीसगाव रोड पोलिसांनी गजाआड केले आहे. या टोळीने धुळे शहरातील एका तरुणाला ३ लाखांचा गंडा घातला होता. तक्रार प्राप्त होताच चाळीसगाव रोड पोलिसांनी धडक कामगिरी करत अगदी शिताफिने या टोळीला जेरबंद केले आहे.

शहरातील चाळीसगाव रोड परिसरात राहणारा तरुण ज्ञानेश्र्वर रोहीदास चौधरी हा आपल्या लग्नासाठी मुलीच्या शोधात असताना एजंट मोरे याने सुंदर अशा बनावट नवरी मुलीचा फोटो दाखवला. सदर मुलगी पसंत आल्याने तरुणासह त्याच्या नातेवाईकांनी त्याचा विवाह घाईघाईत लावला. त्यानंतर बनावट नवरी व बनावट मुलीच्या आईने संधी साधत त्या ठिकाणाहून पळ काढला होता.

या टोळीला पकडल्यानंतर आज चाळीसगाव रोड पोलिसांनी यावेळी बनावट नवरी व तिचे बनावट नातेवाईक बनणाऱ्या आरोपींच्या हातात पोलिसांनी दिलेले फलक लक्ष वेधून घेत होते. तथापि, बनावट नवरी मुलगी ही अल्पवयीन असल्याने तिची रिमांड होममध्ये रवानगी करण्यात आली आहे. दरम्यान, या कारवाईमुळे ठगबाजी करणाऱ्या टोळींमध्ये धडकी भरणार आहे. तसेच पोलिसांनी पकडलेल्या टोळीने अन्य तरूणांची फसवणूक केली असण्याची शक्यता आहे. पोलीस त्या दिशेनेही तपास करीत असल्याची माहिती सहायक पोलिस अधीक्षक ऋषिकेश रेड्डी यांनी यावेळी दिली.

### आमदार नितेश राणे यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ गोंदियात शिवसेना ठाकरे गटाचे आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :** भाजपाचे आमदार नितेश राणे यांनी शिवसेना ठाकरे गट पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या बद्दल जे वक्तव्य केले त्याचे पडसाद गोंदिया जिल्ह्यात सुद्धा दिसून आले. आज गोंदिया जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटा तर्फे आमदार नितेश राणे यांच्या वक्तव्याच्या निषेध करत त्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारत पुतळ्याचे दहन करण्यात आले. यावेळी शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी आमदार नितेश राणे यांच्या निषेधार्थ जोरदार घोषणा दिल्या आहेत.

### कॅरीऑन सुविधेसाठी युवा सेनेचे कुलगुरूंच्या कक्षा बाहेर ठिय्या आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी** :अमरावती विद्यापीठांतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांमधील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना कॅरी ऑन सुविधा देण्याच्या मागणीसाठी विद्यार्थी युवा सेने तर्फे कुलगुरूंच्या कक्षा बाहेर ठिय्या आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात अमरावती विभागाच्या पाचही जिल्ह्यातील विद्यार्थी सहभागी झाले होते. सर्व अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील वर्षात सशर्त प्रवेश देण्यात यावा तसेच पुढील शैक्षणिक वर्षासाठी लागणारी पात्रता पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना दोन वाढीव परीक्षा सत्रांची मुदत देण्यात यावी या मागण्यांसाठी विद्यार्थी युवा सेनेच्या वतीने जोरदार घोषणा बाजी करत ठिय्या आंदोलन करण्यात आले आहे.

### मुंबई सीबीआय पथकाची नाशिकमध्ये मोठी कारवाई, वरिष्ठ विपणन अधिकारी लाच घेताना रंगेहाथ

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** मुंबईच्या सीबीआय पथकाने नाशिकमध्ये मोठी कारवाई केली आहे. केंद्र सरकारच्या कृषी व विपणन विभागाच्या एगमार्क कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यास एक लाखाची लाच घेताना सीबीआयने रंगेहाथ अटक केली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, केंद्र सरकारच्या कृषी व किसान कल्याण मंत्रालयांतर्गत कृषी उत्पादकांना परवाना देणारे विपणन व तपासणी संचालनालय (एगमार्क) कार्यालय नाशिकरोड परिसरातील आनंदनगरमध्ये असून धुळे येथील डेअरी प्रॉडक्ट्स बनविणाऱ्या कंपनीने परवाना घेण्यासाठी या कार्यालयाकडे पाठपुरावा केला होता.

# स्ट्रक्चरल ऑडिट झाल्याशिवाय मुख्यमंत्र्यांनी बुलढाण्यातील पुतळ्यांचे अनावरण करू नये

## काँग्रेसच्या प्रदेश सचिव जयश्री शेळके यांची मागणी

## बुलढाण्यात २० पेक्षा अधिक महामानवांच्या पुतळ्याचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे अनावरण

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** मालवण येथे छत्रपती शिवरायांचा पुतळा कोसळल्या प्रकरणी सर्व स्तरातून संताप व्यक्त केला जात आहे, तर दुसरीकडे बुलढाणा शहरात आमदार संजय गायकवाड यांच्या संकल्पनेतून जवळपास २३ महापुरुष आणि संतांची पुतळे आणि स्मारक उभारण्यात आली आहेत, याच सर्व स्मारक आणि पुतळ्यांच अनावरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे, त्यामुळे मालवण प्रमाणे बुलढाण्यात अनुचित घटना घडू नये, यासाठी या सर्व पुतळ्यांचं स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावं, आणि ते सार्वजनिक रित्या जाहीर करण्यात याव, अशी मागणी काँग्रेसच्या प्रदेश सचिव जयश्री शेळके यांनी निवेदनाद्वारे केली आहे, स्ट्रक्चरल ऑडिट झाल्याशिवाय मुख्यमंत्र्यांनी या पुतळ्यांचे अनावरण करू नये असाही उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे...



### कोचिंग क्लासमध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थीनीसोबत गैरवर्तवणुक करणाऱ्या शिक्षकाला भाग्यनगर पोलिसांनी केली अटक

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड शहरातील भाग्यनगर पोलीस ठाणे हद्दीतील एका खाजगी कोचिंग क्लासमध्ये शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थीनीसोबत कोचिंग क्लासमधीलच एका शिक्षकाने गैरवर्तवणुक केल्याचे प्रकरण उघडकीस आले आहे. या प्रकरणात भाग्यनगर पोलीस ठाण्यात ५५ वर्षीय आरोपी नागेश जाधव याच्या विरोधात, पॉक्सो व ट्रॉसिटी कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.



# जालन्याला महाराष्ट्राच्या नेतृत्वाची संधी मिळेल!

दैनिक आपला विदर्भ


**जालना/प्रतिनिधी :** व्यापारी पेठ म्हणून देशभर नावलौकिक असलेल्या जालना शहरात व्यापारी महासंघ सशक्त असून व्यापाऱ्यांच्या अडचणी, समस्या सोडवल्या आहेत. गतवर्षी रौप्य महोत्सवी अधिवेशनातून येथील व्यापाऱ्यांनी कल्पनाशक्ती, संघटन कौशल्य, नेतृत्व क्षमता यांची चुणूक मराठवाड्याला दाखवून दिली. या बळावरच मराठवाडा ट्रेड ऑफ चेंबर्स अँड कॉमर्स च्या कार्यकारिणीत जालन्याला मानाची पदे मिळाली असून भविष्यात महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याची संधी जालना जिल्हा व्यापारी महासंघास मिळेल असा विश्वास मान्यवरांनी आज व्यक्त केला.

स्वातंर्त्य सैनिक रामभाऊजी राऊत नागरी सहकारी पतसंस्था आणि जालना जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने मराठवाडा ट्रेड ऑफ चेंबर्स अॅन्ड कॉमर्स पदाधिकाऱ्यांचा मंगळवारी ( ता. ०३) पतसंस्थेच्या सभागृहात जाहीर सत्कार करण्यात आला.

यावेळी व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विनीत साहनी,संघटन मंत्री तथा पतसंस्थेचे अध्यक्ष राजेश राऊत, सत्कारमूर्ती मराठवाडा ट्रेड ऑफ चेंबर्स अॅन्ड कॉमर्स चे महासचिव शाम लोया,सहसचिव संजय दाड, कार्यकारिणी सदस्य सुभाषचंद्र देवीदान, दिलीप शाह, इंदरचंद तवरावाला, गोवर्धन अग्रवाल,सी.ए .गोविंद प्रसाद मुंदडा, विजयकुमार बगडिया ,लक्ष्मीनारायण मानधना यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रस्ताविकात राजेश राऊत यांनी जालना शहरात पुर्वीपासून व्यापारी बांधवांचे वर्चस्व राहिले असून नेतृत्वास बळकटी मिळावी यासाठी कौटुंबिक सत्कार सोहळा आयोजित केल्याची भूमिका राजेश राऊत यांनी स्पष्ट केली.

# सततच्या मुसळधार पावसामुळे शेती पाण्याखाली; शेतकऱ्यांचे मोठे नुकसान



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे जिल्ह्यातील सर्व प्रकल्प नदी नाले दुथडी भरून वाहत आहेत. मात्र याचा मोठा फटका शेतकरी राजाला बसला आहे. जिल्ह्यातील घाटावर आणि घाटाखाली दोन्ही विभागात मुसळधार पावसामुळे उभ्या पिकात पाणी साचले असून मका, सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेले पिक जमीनदोस्त झाले आहे. ग्रामीण भागात पावसाने हाहाकार माजवला असून शेतकऱ्यांचे मोठं नुकसान झाल्याचे चित्र दिसत आहे.

# मनमाड इंदूर रेल्वे मार्ग मंजूर,५ वर्षात रेल्वे मार्ग पूर्ण होणार – डॉ हीना गावित

दैनिक आपला विदर्भ

**नंदूरबार/प्रतिनिधी** :अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला मनमाड इंदूर रेल्वे मार्ग मंजूर करून गतिमान विकास आणि ठोस उपायांसाठी लोकप्रिय झालेल्या केंद्रातील मोदी सरकारने मोठी भेट दिली आहे. मनमाड इंदूर या रेल्वे मार्गासाठी केलेला पाठपुराव्याला केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंजुरी दिली असल्याची माहिती आज भाजपा च्या राष्ट्रीय प्रवक्त्या व माजी खासदार डॉ हीना गावित यांनी पत्रकार परिषदेत दिली.

नंदुरबार धुळे जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने अति महत्त्वाचे जे जे प्रश्न असतील त्यांना दिल्ली दरबारात चालना देण्यासाठी, केंद्र सरकारच्या माध्यमातून ते सर्व प्रश्न सोडवून घेण्यासाठी मी कायमच प्रयत्नशील राहिले आणि त्यामुळे माझ्या खासदारकीच्या दोन्ही कार्यकाळात व्यापार शेती उद्योग याला चालना देणारे निर्णय करून घेण्यात मला यश मिळाले.

उधना ते भुसावळ रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण मार्गी लागावे, या मार्गावरील रेल्वे स्थानकांना आधुनिक सुविधा मिळाव्या, नंदुरबार रेल्वे स्थानकाचे आधुनिकीकरण केले जावे हे निर्णय मोदी सरकारच्या व्यापक दृष्टिकोनामुळे आणि गतिमान कार्यपद्धतीमुळे होऊ शकले आदिवासी भागाला याचा मोठा लाभ झाला आता मोदी सरकारच्या त्याच गतिमान कार्यपद्धतीचा आणखी एक मोठा लाभ आपल्याला झाला आहे. मनमाडपासून मध्यप्रदेशातील इंदूर शहरापर्यंत ३०९ किमी लांबीचा नवा रेल्वेमार्ग बांधण्याच्या निर्णयाला केंद्रीय मंत्रिमंडळाने सोमवारी मंजुरी दिली. या प्रकल्पासाठी १८०३६ कोटी रुपये खर्च होणार असून ५ वर्षाच्या कालावधीत हा रेल्वे मार्ग पूर्ण होणार आहे.मनमाड ते इंदूर रेल्वेमार्गावर ३० नवी रेल्वे स्थानक उभारण्यात येतील. १,००० गावांना आणि ३० लाख लोकसंख्येला दळणवळणाचे प्रभावी साधन उपलब्ध होईल.



सर्वात महत्त्वाचं असं की, शिरपूर, लौकी आणि सांगवी हे तीन रेल्वे स्थानक या अंतर्गत निर्माण होतील. त्यामुळे नंदुरबार जिल्ह्यातील प्रवासी वाहतूक आणि दळणवळण गतिमान बनेल. आपल्या खानदेशातून इंदूर पर्यंत जाणारा मार्ग जलद होईल. धुळे ते इंदूर आणि धुळे ते मनमाड हा नवा रेल्वे मार्ग जोडला गेल्यामुळे दिल्ली इंदोर मुंबई सर्वत्र चा प्रवास खानदेशवासीयांना सोपा होईल.

या नव्या रेल्वे मार्गामुळे खानदेशातील व्यापार उदीम वाढीस लागून अन्नधान्याची वाहतूक शेती उत्पन्नाचे वाहतूक याचबरोबर रोजगारासाठी प्रवास करणारे यांना हा रेल्वे मार्ग निश्र्चितच लाभदायक होईल.असे देखील मा.खा. डॉ हीना गावित यांनी बोलताना सांगितले.